श्री हरिहर प्रतिष्ठान संचलित

## गोंविदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय, लातूर

# साहित्यातील नवप्रवाह


मुख्य संपादक

डॉ. सुजाता चव्हाण

प्र. प्राचार्य

संपादक

प्रा. आरेफ शेख

प्रा. विद्यादेवी कांबळे





1181

891.468

# मराठी साहित्यातील नवप्रवाह

- **डॉ. सुजाता चव्हाण,** मुख्य संपादक
**प्रा. आरेफ शेख,** संपादक
**प्रा. विद्यादेवी कांबळे,** संपादक

- **प्रकाशक:**
**विझक्राफ्ट पब्लिकेशन्स् ॲन्ड डिस्ट्रीब्युशन प्रा. लिमिटेड,**
**१२९/४९८, वसंत विहार, मुरारजी पेठ, जुना पुणे नाका, सोलापूर- ४१३००१**
**भ्रमणध्वनी - ०९६३७३३५५५१, ०७०२०८२८५५२**
**ई-मेल - wizcraftpublication@gmail.com**

- **मुद्रक:**
**पालवी प्रिंटर्स,**
**१२९/४९८, वसंत विहार, मुरारजी पेठ, जुना पुणे नाका, सोलापूर-४१३००१**

- ISBN: ९७८-९३-८६०१३-८२-८

- रुपये: ३००/-

**सर्व हक्क सुरक्षित** (या पुस्तिकेतील प्रकाशित माहिती पूर्व परवानगी शिवाय कुठल्याही माध्यमाव्दारे पुर्न प्रकाशित करता येणार नाही.)

या पुस्तकातील प्रकाशित माहिती, मते, विधान, विचार इत्यादी लेखकांचे वैयक्तिक असून लेखकांने व्यक्त केलेली मते, माहिती, विधाने, विचार, इत्यादी बाबत प्रकाशक, मुद्रक आदी सहमत असतीलच असे नाही.

ज्योती लांजेवार यांच्या अजून वादळ उठले नाही मधील 82
संघर्ष
ती केशवराव गायकवाड
त कवयित्रींच्या कवितेतील अस्मितेची जाणीव - एक अभ्यास 87
डॉ. सुरेखा सिताराम बनकर
तिकीकरण आणि मराठी ग्रामीण साहित्याचे भवितव्य 97
डॉ.भदाडे भारत भगवानराव
ीण साहित्याची भाशा – एक आकलन 102
भरतकुमार जसाभाटी
कार क्षेत्रातील भ्रष्टाचाराचा हाहाकार मांडणारी कादंबरी 107
शवृक्षाच्या मुळ्या
नेश्वर अशोकराव कदम
ीवादी साहित्यप्रवाह 114
. मारोती रामराव कोल्हे
ाठी दलित कवितेतील अस्पृश्यतेची दाहकता 118
. लहू वाघमारे
लत साहित्य प्रवाह 125
. वैशाली के. गायकवाड
त्रीवादी साहित्य प्रवाह 130
ाकिता अनिल शेंडगे
त्रीवादी साहित्यप्रवाह 121
ियांका अनिलकुमार खरात
ागतिकीकरणात माझी कविता : एक आकलन 139
ी. शीतल सचिन गोर्डे-पाटील
त्रीवादी साहित्यप्रवाह नाटकांच्या संदर्भात 147
डॉ.संदीप अ.बनसोडे
जागतिकीकरणाचा आदिवासी साहित्यावरील प्रभाव 157
ा. मोरे पंडित किशनराव
ब्म्हास्त्ररूपी जागतिकीकरणः 'चाळेगत' 164
ा.डॉ. शिवराज काचे





26. गौरी देशपांडे, मेघना पेठे आणि सानिया यांच्या कथेतील स्त्रीवादी जाणीवा 169
जगदाळे किरण आगतराव
27. स्त्रीवादी साहित्य प्रवाह 177
डॉ.अशोक गौरीशंकर माळगे
28. जनसाहित्य प्रवाह 172
Swapnali Santosh Yamgekar
29. स्त्रीवादी साहित्य प्रवाह 205
Manisha P. Chavan
30. ग्रामीण साहित्य प्रेरणा : एक चिंतन 216
प्रा.डॉ. उन्मेष शेकडे
31. मराठी ग्रामीण कथेतील शेतकरी आत्महत्येचे चित्रण 228
प्रा.डॉ.जयद्रथ सुभाषरा जाधव
32. जनसाहित्यकार - डॉ. सुभाष सावरकर 232
प्रा. विद्या कांबळे
33. ग्रामीण संस्कृतीचे वास्तव चित्रण करणारा कथासंग्रह 'खिलाऱ्या' 238
प्रा. डॉ. केशव आलगुले
34. दलित साहित्याचे स्वरुप 242
प्रा. राजकुमार मोर
35. मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री चित्रण 214
डॉ. शेटकार रामशेट्टी राजेंद्र
36. ऊसतोड कामगारांची व्यथा : उचल 257
डॉ. तुळशीराम उकिरडे
37. आदिवासी साहित्य प्रवाह 264
सुरकुले अनिता सोमनाथ
38. साठोत्तरी ग्रामीण कांदबरी : एक दृष्टिक्षेप 268
प्रा.डॉ.संग्राम टेकल
39. उच्च शिक्षण क्षेत्रातील सावळा गोंधळ चित्रण करणारी कादंबरी : 'रात आंधळे' 276
डॉ.शिवाजी जवळगेकर आणि भगवान लिंबाजी भालेकर
40. विजय तेंडुलकरांची नाटके : आकलन व आस्वाद 282
माधुरी बोडा

## 32
## जनसाहित्यकार - डॉ. सुभाष सावरकर

**प्रा. विद्या कांबळे,** गोविंदलाल कन्हैयालाल जोशी,
(रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय, लातूर

मराठी साहित्य सृष्टी समृद्ध करण्यात आधुनिक प्रवाह महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. मध्ययुगीन मराठी साहित्यातील संत साहित्याने मराठी साहित्य समृद्ध केले. तसेच त्यांच्या अभंगाच्या रचनेने समाजातील वास्तव आणि प्रबोधन करण्याचेही कार्य केले. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यसृष्टीत कायापालट झालेला दिसून येतो. साठोत्तरी साहित्य प्रवाहातून मराठी साहित्य हे अधिक प्रमाणात नावारूपाला आलेले दिसते. प्रत्येकाने आप आपल्या परीने साहित्यात जाणिवांची मांडणी केली. आपल्या जगण्यातील जाणिवाव्यक्त करून, समूह भावना व्यक्त करून त्या त्या समुहाचे मन, भावना, दुःख, यातना, प्रश्न, समस्या मांडून त्यांची कारणे आणि परिणाम व्यक्त करून उपाय शोधण्याचाही प्रयत्न केला गेला. साहित्यसृष्टीतील हे परिवर्तन मोठ्या प्रमाणात झाल्याने प्रवाहाची निर्मिती झाली जी साहित्यातील नवप्रवाह या नावाने ओळखले जाऊ लागले.

साहित्यातील ही नवसाहित्य प्रवाहाची निर्मिती सामूहिक स्वरूपाची दिसून येते. इथे व्यक्तीचा विचार न करता समुहाचा विचार केला जाऊ लागला. ज्यात प्रथम गाव कुसा बाहेरील लोकांना स्वची जाणीव झाली आणि सामाजिक प्रश्नावर वास्तवतेवर ते परखड प्रमाणात भाष्य करू लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्सवाद, अण्णाभाऊ साठे यांची प्रेरणा घेऊन दलित साहित्य प्रवाह प्रथम साहित्यात आला. 'खेड्याकडे चला' या घोषणेतून पुढे आलेला, खेड्याचे जीवन चित्रित करणारा कृषी समाजाची व्यथा वेदना कष्टकऱ्यांचे जीवन चित्रीत करणार निसर्ग, शेती यावर भाष्य करून अस्तित्वाचा प्रश्न मांडणाराग्रामीण साहित्यप्रवाह ही पुढे आला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सामाजिक, राजकीय, आर्थिक घडामोठी मोठ्या प्रमाणात झाल्या. त्यातच शहरीकरणावर भर देण्यात आला. वनातून जीवन जगणाऱ्याच्या मुलभूत गरज निवारा याचाच प्रश्न निर्माण झाला आणि त्यातून वाचा फुटून आदिवासी साहित्य प्रवाहाची निर्मिती झाली. शिक्षणापासून वंचित असलेला, शहरापासून दूर असलेला असा आदिवासी साहित्य निर्मिती करू लागला आणि मराठी



साहित्य सृष्टी ही मोठ्या प्रमाणात समृद्ध झाली. पुरूषप्रधान संस्कृतीतील गौणस्थान आणि कोणत्याही प्रकारच्या कामात आपला सहभाग ही पुरुषसत्ताक व्यवस्था करून घेत नाही याभावनेतूनच स्त्रीवादी साहित्य प्रवाहाची निर्मिती झाली जी मोठ्या प्रमाणात नावारूपाला आलेली दिसून येते. पाश्चात्य देशातूनही संस्कृती भारतीयापर्यत आली असे म्हणत असताना ताराबाई शिंदे यांनी स्त्रियावरच्या होणाऱ्या अन्यायाला कडाडून प्रतिउत्तर देणाऱ्या साहित्य संस्कृतीचा 'स्त्री पुरुष तुलना' याचा संदर्भ देता येतो.

जनवादी साहित्य प्रवाहाची निर्मिती ही साठोत्तरी साहित्य प्रवाहात स्वतंत्र प्रवाह म्हणून केला जाऊ लागला. साठोत्तरी साहित्य प्रवाहातील स्वतंत्र प्रवाह म्हणून ओळखला जाणारा जनवादी साहित्य प्रवाहाला 'जनसाहित्य' असे नाव देऊन डॉ. सुभाष सावरकर यांनी जननिष्ठ दृष्टिकोन ठेऊन साहित्य निर्मिती केली. डॉ. सावरकर यांच्या जनसाहित्यातून साहित्य निर्मितीला मोठ्या प्रमाणात पहिल्यांदा विरोधही झाला परंतू जनसाहित्याची परंपरा ही आताची नाही तर त्याची परंपरा ही फार मोठी आहे हे सिद्ध केल्यानंतर त्या साहित्य प्रवाहाला मराठी साहित्य सृष्टीत एक स्वतंत्र प्रवाह म्हणून ओळखण्यात येऊ लागले. याचे सर्व श्रेय डॉ. सुभाष सावरकर यांना जाते.

साठोत्तरी साहित्य प्रवाहातील एक महत्त्वपूर्ण प्रवाह जनसाहित्य प्रवाह सर्व साहित्य प्रवाहांना समाविष्ट करून घेणारा हा प्रवाह आहे. कोण्या एका व्यक्तिची प्रेरणा या प्रवाहाला लाभलेली नसून अनेक जनहित जोपासणारे त्यांचे साहित्य याची अनेक प्रेरणा या साहित्य प्रवाहाला नवी ओळख आणि मराठी साहित्यात नावारूपाला आणण्याचे महत्त्वपूर्ण काम डॉ. सुभाष सावरकर यांनी केले. जनसाहित्य प्रवाह हा विदर्भाची मराठी साहित्याला लाभलेली मौलिक अशी देणगी आहे. जनसाहित्य आणि सुभाष सावरकर या एकमेकांशी संलग्नित अशा बाबी आहेत. प्रस्तुत शोधनिबंधातून जन साहित्यकार डॉ. सुभाष सावरकर म्हणून नावारूपाला येत असताना त्यांना करावा लागणारा संघर्ष आणि एक स्वतंत्र प्रवाहाच्या निर्मितीत त्यांच्या साहित्यकृतीतून येणारे योगदान 'अक्षर वैदर्भी' ची निर्मितीची प्रेरणा याचा विचार केला आहे.

डॉ. सुभाष सावरकर यांची कौटुंबिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. आई कलावती व वडील दामोदर (उर्फ सुदाम) यांच्या पोटी २३ जानेवारी १९४६ रोजी अमरावती येथे डॉ. सुभाष सावरकरांचा जन्म झाला. आई कलावतीबाई या अमरावती येथील शासकीय शिक्षक प्रशिक्षण संस्थेच्या सराव प्राथमिक शाळेत शिक्षिका होत्या. कुटुंब प्रमुख वडील सुदाम सावकर हे राष्ट्रसंत तुकडोजी

महाराजांच्या जवळजवळ संपूर्ण साहित्याचे संपादक तसेच श्री. गुरूदेव मासिकाचे संपादक होते. भारतीय राष्ट्रीय सेनानी बाबू सुभाष चंद्र बोस यांच्या जयंतीच्या दिवशीच संध्याकाळी सुभाषचा जन्म झाला जे कलावती बाई यांचे तिसरे अपत्य. म्हणून त्यांच्या क्रांती कार्याची जाणिव आणि प्रेरणा यातून सुभाष हे नाव सुदाम सावरकर यांनी आपल्या अपत्याचे ठेवले. सुभाषचे बालपण हे आपल्या भावंडासोबत आणि आई कलावती यांच्या स्नेहात अंबापेठच्या निवासस्थानीच गेले. अंबापेठेतील शाळेतील शिक्षण आणि आई-बरोबरच असल्याने संस्कार ही सुभाषवर तसेच झाले प्राथमिक शिक्षणानंतर ८ वी ते ११ वी पर्यंतचे शिक्षण अमरावतीच्या कलानिकेतन तिथेच पूर्ण केले. ११ वी परीक्षेत प्रथम श्रेणीत पास होऊन गणित विज्ञान आणि अभियांत्रिकी विषयात प्राविण्य मिळाले. शैक्षणिक प्रवास आपल्या भावंडासोबत सुरू केलेल्या सुभाषला सवंगडी सोबतचे मध्यमवर्गीय कुटुंबातील होते. शिस्तप्रिय वातावरणात सुभाषची शैक्षणिक जडण-जडण होऊ लागली. बौद्धिक गुणवतेच्या दृष्टीने उत्तम सुभाष वाचनाचा जोपासू लागला. साने गुरूजींच्या कथा, कादंबऱ्या, छंद, जिब्रान, वि. वा. हडपाच्या व नाथ माधव यांच्या कादंबऱ्या वाचून काढल्या वयाच्या १०-११ व्या वर्षीच अंबापेठेतील घरात 'सखाराम' नावाची सानेगुरूजींच्या भाषाशैलीचा प्रभाव असलेली कादंबरीच लिहून काढली.

सुदाम सावरकर यांच्या परोपकारी चिंतनशील स्वभावाचा प्रभाव सुभाषवर पडला आणि त्यांची जडणघडण होत गेली. महाविद्यालय शिक्षणाचा प्रारंभ १९६१ साली अमरावती येथील विदर्भ महाविद्यालयात विज्ञान वर्षाच्या प्रवेशापासून झाला. मराठी इंग्रजी विषयाच्या प्राध्यापकांचा ठसा मनपटलावर उमटत गेला. १९६२-६३ साली मराठीत काव्यरचना केली आणि महाविद्यालयात आयोजित कविसंमेलनात सादर केल्या. बी. ई. इलेक्ट्रीकलला सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग ही नोंदवला.

विद्युत अभियांत्रिकी बी. ई. हे क्षेत्र आपले नाही अशी जाणीव सतत होत असल्याने ही विद्याशाखा ही अभ्यासशाखा आपली नाही तर साहित्यात रूची आहे याची जाणीव होऊ लागली. त्याच जाणीवेपोटी सुभाष सावरकर यांनी बी.ए. ची परीक्षा मराठी विषय घेऊन आणि एम.ए. ची ही परीक्षा तशीच देण्याचा निर्णय घेतला. एम.ए. मराठी ही बहिःशाल पदवी पास करून घेतली. मराठीतून संशोधन कार्य करावे या ओढीने प्रयत्न सुरू झाले. त्या दरम्यान सुभाष सावरकर यांचा मे १९७१ मध्ये नीळकंठराव तराट यांच्या निर्मला या कन्येशी त्यांचा विवाह झाला. वैवाहिक जीवन सुरळीत होते. त्यातच साहित्याची आवड त्या पोटी डॉ. भाऊ मांडवकर यांच्या मार्फत संपर्क करून प्रा. डॉ. दाभाडे यांनी पीएच.डी. मार्गदर्शन करण्याचे मान्य केले. 'अस्तित्त्वाद मराठी कादंबरी' असा विषय घेऊन संशोधन चे कार्य सुरू केले. १९७३ मध्ये वयाच्या २७ व्या वर्षी सुभाष सावरकर यांना पीएच.डी. मराठी ही पदवी विक्रम विश्वविद्यालयातर्फे मान्य करण्यात आली. अधिव्याख्याता शासकीय तंत्रनिकेतन या पदावर शासकीय तंत्रनिकेतनमध्ये नियुक्ती केलेली असताना साहित्याविषयीचा जिव्हाळा डॉ. सुभाष सावरकरांकडून सुटला नाही आणि मराठी विषयातील आचार्य पदवी साठीच्या १० शोधछात्रांना मार्गदर्शन ही त्यांनी केले.



डॉ. सुभाष सावरकरांची साहित्य निर्मिती ही पूर्णपणे जननिष्ठ भूमिकेतूनच झाली. त्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक वैचारिक समीक्षणपरलेखन संपादीत ग्रंथ यांचा समावेश आहे. आकरा पाच कादंबऱ्या, चार कथा संग्रह, एक नाटक, एक चरित्र, समीक्षाग्रंथ, १३ ग्रंथांचे संपादन केले. जननिष्ठ दृष्टितून साहित्य लिखाण करताना डॉ. सुभाष सावरकरांनी जन-निखळ माणूस, जनत्व-निखळ माणूसपण, जननिष्ठा निखळ माणुसकीवर अभंग निष्ठा हे तत्त्व मान्य केले. जनसाहित्य हे वर्ण, वर्ग, पंथ, पक्ष आदि भेद मान्य करत नाही तर ते व्यापक भारतीय होऊ पाहणारे साहित्य होय. जनसाहित्य हे तत्वतः सामाजिक बांधिलकी असलेला परिवर्तनव ादी साहित्य विचार आहे ते सार्वकालिक आहे. असाही अर्थ मांडला गेला आणि त्यांच्या साहित्य कृतीतून ते सर्वमान्यही झाले आहे. 'जननिष्ठ जाणीवांचा कलात्मक दृष्टीने घेतलेला वेध म्हणजे जनसाहित्य तसेच जनहितेषी व्यक्तिमत्वाने शब्दबद्ध केलेला संप्रेषणक्षम जीवनानुभव म्हणजे जनसाहित्य अशी संकल्पना स्पष्ट करणारी मत डॉ. सुभाष सावरकरांनी दिली.'

जनसाहित्य ही संकल्पना अधिकतेने स्पष्ट करण्यासाठी 'जनसाहित्य' नावाचे पुस्तकच निर्माण केले जे जनसाहित्याचा व्यापक अर्थाने अभ्यास करते. "जे साहित्य जनसामान्यांच्या धारणांची जननिष्ठ जाणिवांसह कलात्मक अभिव्यक्ती करते ते साहित्य म्हणजे जनसाहित्य अशी जनसाहित्याची सर्वसाधारण भूमिका दिसून येते."[१] जनसाहित्य या चळवळीत प्रत्येक त्या व्यक्तीचा समावेश आहे जो उपाधी निरपेक्ष, माणुसकी, माणूसपण जपतो, त्यात स्त्री असो की पुरुष असो, कोणत्याही वर्गाचा, धर्माचा, मातीचा, पंथाचा असो तो फक्त माणूसपण जपणारा असावा. जनसाहित्यातील 'जन' या शब्दात उपाधी निरपेक्ष निखळ माणसाचा समावेश होतो. असे मत डॉ. सुभाष सावरकरांनी मांडले.

जनसाहित्याच्या परंपरेचा अभ्यास करता डॉ. सुभाष सावरकर यांनी प्राचीन

परंपरेचा अभ्यास केलेला आहे. वेदपूर्वकालीन आर्य-अनार्य संस्कृतीचा संदर्भ देता येतो. जनसाहित्याला प्रेरणा देणारा पहिला स्पष्ट उद्गार महातमा गौतम बुद्धाचा आहे. बुद्ध महावीरानंतर जनसाहित्याचा महत्त्वाचा नायक गुरू गौरक्षनाथ, मराठीच्या उदयापूर्वीच भारतीय जनसाहित्याला, स्वतंत्र, स्वयंपरा निर्माता म्हणूनही गोरक्षांकडे पाहावे लागते. चंद्रधर, संत साहित्यातील संत कवी, यांचा उल्लेख करावा लागतो. ब्रिटिश कालखंडात जनसाहित्याचा अस्सल प्रेरणा स्त्रोत म्हणजे महात्मा ज्योतीराव फुले पुरस्कार, बुद्धिवादी विद्रेही असे रूप डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिसून येतात. राष्ट्रसंत तुकडोजी हे संत परंपरेचे सुत्र घेऊन व्यापक समन्वयाच्या भुमिकेवर आरूढ होऊ पाहणारे जननायकांचे परंपरामान्य असे एक रूप त्यानंतर श्री. म. माटे विभावरी शिरूरकर, अण्णाभाऊ साठे, बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्य हे जननिष्ठ भूमिकेला स्विकारणारे असे आहे.

डॉ. सुभाष सावरकरांच्या विचाराला प्रवाहाच्या विरोधात विचार आहे असे म्हणून फेटाळण्यात आले आणि त्याच विचाराने झपाटून जाऊन 'अक्षर वैदर्भीची' निर्मिती १९८४ साली केली केली आणि स्वतंत्र जनसाहित्याच्या आभ्यास करून जनसाहित्यकांची पिढी घडविण्याच्या आणि त्यांच्या साहित्यकृतींना वाव देण्यासाठीचे व्यासपीठ निर्माण केले गेले. अनेक टीका टिप्पणी या विचारावर झाल्या. त्या प्रत्येक विचाराचे खंडन करून हा एक स्वतंत्र प्रवाह आहे हे डॉ. सुभाष सावरकर यांनी सिद्ध केले. आणि त्यांच्या वैशिष्ट्याची मांडणी केली. ज्यातून आजच्या नव्या पिढीला जनसाहित्य ही संकल्पना पाहण्यासाठी आणि त्यांच्या भूमिकेच्या संदर्भातील खरी स्पष्ट मत कळावी त्यातील संदिग्धता संपून नवसाहित्यातील नवीन प्रवाह म्हणून ओळखला जावा यासाठी साहित्यनिर्मितीही केली.

डॉ. सुभाष सावरकर यांच्या जनसाहित्य या प्रवाहाला स्वतंत्र प्रवाह म्हणून नवसाहित्यात ओळखला जावा यासाठीची सैद्धांतिक मांडणी ही केली. जनसाहित्य हा इतर प्रवाहासारखाच वैशिष्ट्ये घेऊन मराठई साहित्यात अवतरला त्याची एक वेगळी भाषा स्विकारली गेली जी जनभाषा म्हणून मान्य केली गेली. डॉ. सुभाष सावरकरांनी राष्ट्रसंत तुकजोडी यांच्यापासून निर्माण झालेली ही संकल्पना तिला व्यापक व्यासपीठ निर्माण करून दिले आणि साहित्यकारांनी ते स्वीकारही केले. सावरकरांच्या या कार्यासाठी त्यांच्या ग्रंथाना अनेक पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. जनसाहित्याची परंपरा आणि त्यांच्या प्रेरणा ह्या जशा पद्धतीने मांडल्या आहेत. त्यातून हा प्रवाह इतर प्रवाहासारखाच त्याहूनही निखळ माणसांचा अभ्यास करणारा ठरतो असे आम्ही



म्हणायला काहीच हरकत नाही.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. सुभाष सावरकर जनसाहित्य, वैभव गरग फोंडेकर, मित्र समाज प्रकाशन, गोवा.

२. डॉ. सुभाष सावरकर, जनसाहित्य चळवळ वाद-संवाद मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती

३. डॉ. कल्पना मेहरे, अस्तित्ववाद ते जनसाहित्य डॉ. सुभाष सावरकर मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती.

४. डॉ. सुभाष सावरकर, जनक्रांतीची दिशा, वैभव गरग, कोंडेकर मित्र समाज प्रकाशन, गोवा, २०१३.

## महाविद्यालया बाबत

आर्थिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या भागात उच्च शिक्षणाची सुविधा प्रदान करण्याच्या हेतुने श्री. धनराजजी जोशी यांनी २०१२ मध्ये श्री. हरिहर प्रतिष्ठान संचलित गोविंदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. मराठवाड्यातील पहिले रात्रीचे महाविद्यालय दिवसभर काम करून रात्री अध्यापनाची सुविधा करून देण्याचा उद्देश ठेवून कार्यरत आहे. शैक्षणिक ओढ आणि साहित्याविषयीच्या जाणिवेपोटी या शिक्षणसंस्थेने दि. १८ फेब्रुवारी २०१९ रोजी एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी धडपडत असलेले हे महाविद्यालय आहे.

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणारे मराठवाड्यातील पहिले रात्रीचे महाविद्यालय.
- मराठी तसेच इंग्रजी माध्यमांची निवड
- NPTL हा अभ्यासक्रम शिकवले जाणारे देशातील हे एकमेव महाविद्यालय आहे.
- ICWA, CA कोर्स ही सातत्यपूर्वक वाणिज्य शाखेसोबत चालविले जातात.
- अत्यावश्यक पायाभूत सुविधा, सुसज्य संगणक प्रयोगशाळा, अनुकूल शैक्षणिक वातावरण.
- सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचे लक्षणीय यश.

WIZCRAFT
Publications & Distribution Pvt. Ltd.
Registered Office:
129/498, Vasant Vihar, Near Old Pune Naka, Solapur- 413 001 (Maharashtra) India
09637335551, 07020828552 E-mail:wizcraftpublication@gmail.com

ISBN 978-93-86013-82-8
9 789386 013828

Rs. 300/-